**दिन विशेष...**

१९२६ : ग्रामीण साहित्यिक शंकर पाटील यांचा जन्मदिन.

१९३२ : मराठी लोकप्रिय अभिनेते दादा कोंडके यांचा जन्म.

१९४२ : 'चले जाव' ही घोषणा गांधीजींनी मुंबईच्या गवालिया टँक या मैदानावरुन दिली.

१९९० : उद्योगपती नवल गोदरेज यांचे निधन.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८०६२३.२६ +७९.२७(०.०९८%)
डॉलर ₹ ८७.३८

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३३ | २५ |
| दिल्ली | ३५ | २७ |
| मुंबई | ३१ | २६ |
| नागपूर | ३२ | २५ |
| पुणे | २८ | २३ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव | शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५ | वर्ष १ ले | अंक २७१ | किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

यश न मिळणे याचा अर्थ अपयशी होणे असा नाही.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-६:०४ संध्या-७:०४

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,०२,५५०/- १,१७,०००/-

**केळी भाव**

नवती : १९०० ते १९५०
पिल बाग : १००१ ते १०५०
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### उधमपूरमधील अपघातात दोन जवानांचा मृत्यू

**उधमपूर ।** जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात एक मोठा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. याठिकाणी सीआरपीएफच्या बंकर वाहनाला अपघात झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. बसंतगड परिसरातील कांडवा भागात हा अपघात झाला, ज्याठिकणी वाहनाने अचानक नियंत्रण गमावून रस्त्यावर उलटले. या अपघातात २ सीआरपीएफ जवानांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर १२ इतर जवान जखमी झाले असल्याचे म्हटले जात आहे.

### कंगना राणावतला न्यायालयाचा धक्का

**चंडीगड ।** हिमाचल प्रदेशातील मंडी येथील भाजप खासदार कंगना राणावत यांना पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयातून मोठा धक्का बसला आहे. कंगनाने महिंदर कौर या शेतकरी महिलेने पैशासाठी शेतकरी आंदोलनात निषेध केल्याचा आरोप केला होता. या प्रकरणात पीडित महिंदर कौरने कंगनाविरुद्ध मानहानीची तक्रार २०२१ मध्ये दाखल केली होती.

### महाराष्ट्रातील निवडणुकीत मोठी हेराफेरीचा आरोप

**पटना ।** बिहार निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय जनता पक्षावर गंभीर आरोप केला आहे. आज पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या निवडणुकांबद्दल प्रश्न उपस्थित करत भाजपवर मत चोरीचा आरोप केला आहे. त्यांनी पत्रकार परिषदेत,' पूर्वी इलेक्ट्रॉनिक मशीन्स नव्हत्या, तरीही संपूर्ण देशात निवडणुका एकाच दिवसात होत असत, परंतु आता असे होत नाही?' असा प्रश्न काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषदेत उपस्थित केला आहे.

• शिवसेनेच्या मंत्र्यांना मुद्दामहून लक्ष्य करीत असल्याची पक्ष नेत्यांची भावना

# शिंदेसेना सत्तेतून बाहेर पडणार?

**• मोदी, शहांना एकनाथ शिंदेंचा अप्रत्यक्ष मेसेज; शिवसेनेची जाणूनबुजून कोंडीचा आरोप**

**वृत्तसंस्था । मुंबई**

महायुती सरकारमध्ये सातत्यानं कोंडी होत असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांची भेट घेतली. राज्य सरकारमध्ये असलेले शिवसेनेचे अनेक मंत्री सातत्यानं वादात सापडत आहे. शिवसेनेची जाणूनबुजून कोंडी केली जात असल्याची पक्षातील मंत्री आणि आमदारांची भावना आहे. या सगळ्या तक्रारी शिंदे यांनी महाशक्ती अर्थात मोदी आणि शहांच्या कानावर घातल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



**वादग्रस्त मंत्र्यांवर कारवाईसाठी मुख्यमंत्री आग्रही**

**गेल्या काही दिवसांमध्ये शिंदेसेनेचे अनेक मंत्री अडचणीत आले आहेत. संजय शिरसाट, भरत गोगावले, योगेश कदम, दादा भुसे असे प्रमुख मंत्री वादग्रस्त ठरले आहेत. या मंत्र्यांवर कारवाई करावी, यासाठी मुख्यमंत्री फडणवीस आग्रही आहेत. तर शिवसेनेच्या मंत्र्यांना मुद्दामहून लक्ष्य करत असल्याची पक्षाच्या नेत्यांची भावना आहे. सरकारमधील काही जण यामागे असल्याचा संशय सेनेच्या नेत्यांना आहे.**

एकनाथ शिंदे गेल्या महिन्याभरात तीनवेळा दिल्लीला गेले. पण दोनवेळा त्यांना रिकाम्या हातानं परतावं लागलं. अखेर तिसऱ्या प्रयत्नात त्यांना मोदी आणि शहांची भेट मिळाली. शहांच्या भेटीला जाताना शिंदे पक्षाच्या खासदारांना घेऊन गेले होते. शहा आणि शिंदे यांच्यामध्ये २५ मिनिटं चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार आहेत. यासंदर्भात शहांशी चर्चा केल्याचं शिंदे यांनी माध्यमांना सांगितलं. सर्वाधिक काळ गृहमंत्रिपदी राहिल्याबद्दल शहा यांचं अभिनंदन केल्याचंही शिंदे म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारभारावर शिंदे नाराज आहेत. शिंदे आणि त्यांच्या मंत्र्यांकडून घेण्यात आलेले अनेक निर्णय बदलले जात असल्याचा त्यांचा आक्षेप आहे. शिंदेसेनेच्या काही मंत्र्यांच्या चौकशीचे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे शिंदे अस्वस्थ आहेत. आपली हीच कैफियत त्यांनी मोदी, शहांपुढे मांडली. राज्यात सरकारमध्ये असताना मिळत असलेल्या वर्तणुकीमुळे शिंदेसेनेत प्रचंड नाराजी आहे.

**सत्तेत समान वाटा मिळावा; शिंदेंची मागणी**

महायुती सरकारमध्ये सुरू असलेल्या घडामोडींमुळे शिंदे यांचे मंत्री नाराज आहेत. त्यांची चलबिचल सुरू आहे. एनडीएमधील भाजपचा सर्वात जुना मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला भाजपकडून आदर, मानसन्मान हवा आहे. याचसंदर्भात भाजप नेतृत्त्वाचा शब्द घेण्यासाठी शिंदे दिल्लीला गेले होते. आपल्या पक्षाच्या मंत्र्यांची कोंडी केली (पान २ वर)

# शिंदे सेनेचा पुन्हा एक मंत्री अडचणीत

• स्टंटचे 'प्रताप' करून मिळवली रॅपिडोची स्पॉन्सरशिप



**वृत्तसंस्था । नागपूर**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन महायुती मधील तणाव कमी करण्याचा प्रयत्न करत असताना शिंदे सेनेचा पुन्हा एक मंत्री अडचणीत येताना दिसून येत आहे. शिंदे सेनेचे एकामागून एक मंत्री अडचणीत येत असल्याने महायुतीमध्ये तणाव निर्माण झाल्याचे सांगण्यात आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे वारंवार दिल्लीच्या वाऱ्या करत आहे. तर त्यांचा पुन्हा एका मंत्राचा प्रताप समोर आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक स्टंटचे 'प्रताप' करून रॅपिडोची स्पॉन्सरशिप मिळवल्याचा आरोप होत आहे. यासंदर्भात कांग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी एक्स वर पोस्ट केली आहे.

परिवहन मंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे, की त्यांनी आपल्या इव्हेंटसाठी (पान २ वर)

## एनडीएकडून उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी जे. पी. नड्डांवर महत्त्वाची जबाबदारी

**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

देशाच्या राजकारणातील महत्त्वाची बातमी समोर येत आहे. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यामुळे उपराष्ट्रपतीपद रिक्त झालं आहे. उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक जाहीर झाली आहे. पुढच्या महिन्यात ९ सप्टेंबर उपराष्ट्रपती पदासाठी मतदान होणार आहे. एनडीएकडून उपराष्ट्रपती पदासाठी कोण उमेदवार असेल? याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरु होत्या. अखेर या चर्चांना आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. कारण एनडीएकडून उपराष्ट्रपती पदासाठी महत्त्वाचं नाव निश्चित होण्याची शक्यता आहे.

एनडीएच्या आजच्या बैठकीत महत्त्वाच्या नेत्याला या निवडणुकीसाठी मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांना या निवडणुकीसाठी महत्त्वाची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती मिळत आहे. खरंतर या निवडणुकीसाठी आपला उमेदवार जिंकून यावा, यासाठी जबाबदारी देण्यात आल्याची माहिती आहे.

## कबुतरखान्यांवर बंदी कायम; हायकोर्टाचे समिती नेमण्याचे आदेश

**वृत्तसंस्था । मुंबई**

दादरसह मुंबईतील कबुतर खान्यांसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात आज तातडीची सुनावणी संपन्न झाली. न्यायालयाने आजच्या सुनावणीत कबुतरखान्यांवरील बंदी कायम ठेवली असून एक समिती नेमण्याचे आदेशही दिले आहेत. या प्रश्नावर दोन्ही बाजूंनी विचार व्हायला हवा, त्यामुळेच एक समिती नेमण्यात यावी, ही समिती नागरिकांच्या आरोग्याचा योग्य विचार करेल, पर्यावरणाचा विचार करेल. कबुतरांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका होणार नाही हे या समितीने ठरावावे, त्यानंतरच समितीचा निर्णय सर्वांनी स्वीकारावा, असेही न्यायालयाने म्हटले आहे. (पान २ वर)



**जैन बांधवांचे आंदोलन**

कबुतरखाने बंद केल्यानंतर अन्नाअभावी कबुतरांचा मृत्यू होत असल्याने जैन समाजात असंतोष निर्माण होऊन त्याची परिणीती आंदोलनात झाली. त्यानुसार, काल दादरच्या कबुदतरखाना येथे झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तसेच राज्य सरकारच्या बदललेल्या भूमिकेनंतर आजच्या सुनावणीला विशेष महत्त्व होते. सुनावणीच्या पार्श्वभूमीवर परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त महेंद्र पंडित देखील कोर्टात उपस्थित होते.

## पायाभूत चाचणीची समाजमाध्यमांत पेपरफुटी

**वृत्तसंस्था । पुणे**

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता तिसरी ते नववीच्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका व त्यांची उत्तरे खासगी यू-ट्युब वाहिनीच्या माध्यमातून फोडल्याची घटना उघडकीस आली. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची कोणतीही परवानगी न घेता प्रश्नपत्रिका प्रसारित केल्या प्रकरणात आता खासगी यू-ट्युब वाहिनीवर विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**• १७ ते ३१ जुलैपर्यंत परिषदेच्या वतीने परिक्षेसाठी लागणारी कागदपत्रे खाजगी कार्गो कंपनी मार्फत पाठविण्यात आली होती. त्यानंतर ६ ऑगस्टला दुपारी साडेबारा वाजता एका यू-ट्युब वाहिनीवर संबधित जिल्ह्यांना पाठविलेल्या चाचणी पत्रिका त्यापैकी सातवीचे मराठीचा, ५ ऑगस्टला झालेला आणि ७ ऑगस्टला होणाऱ्या सातवी-आठवीच्या विद्यार्थ्यांची गणिताचे प्रश्नपत्रिका प्रसारित झाल्याचे निदर्शनास आले.**

प्राथमिक तपासात कैलासन सर मॅथ्स, म मराठी, एस. जे. ट्यूशन क्लासेस या तीन खासगी यू-ट्युब वाहिन्यांची नावे समोर आली आहेत. याप्रकरणी सहायक संचालक संगीता प्रभाकर शिंदे (५०, रा. हडपसर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ६ ऑगस्ट रोजी १२.३० वाजेच्या सुमारास निदर्शनास आला. त्यानुसार खासगी यू-ट्युब वाहिनीवर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मंडळाच्या व इतर परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत आधिनियमाच्या विविध कलमान्वये तसेच माहिती तंत्रज्ञान, भारतीय न्यायसंहितेच्या ७२, २२३ आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार संगीता शिंदे या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथे सहायक संचालक पदावर कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राज्य शासनाने २०२१ पासून इयत्ता तिसरी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रथम भाषा मराठी, गणित व तृतीय भाषा इंग्रजी या विषयांच्या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी सुरू केली आहे. त्यानंतर २०२३ पासून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदच्या (पान २ वर)

## भारताविरुद्धचा पराभव स्टोक्सच्या जिव्हारी लागला

**वृत्तसंस्था । मुंबई**

भारतविरुद्ध इंग्लंड कसोटी मालिका नुकतीच संपली. या मालिकेत दोन्ही संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. अखेर मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. या मालिकेतील शेवटच्या आणि निर्णायक सामन्यात भारताने बाजी मारली. या मालिकेत दोन्ही संघाचे अनेक खेळाडू जखमी झालेले पहायला मिळाले.

मालिका सुरु असतानाच संघातील काही खेळाडूंनी संघाची साथ सोडली होती. आता यामधील एक खेळाडू जखमी असूनही तो सध्या प्रशिक्षक बनला आहे. नुकतीच मालिका सपंली आहे आणि त्याने ही जबाबदारी स्वीकारली म्हणून त्याने निवृत्ती घेतली का? अशीही चर्चा रंगली आहे.

## नाशिक जिल्हा रुग्णालयात शासनाची कोट्यवधींची फसवणूक




**वृत्तसंस्था । नाशिक**

जिल्हा रुग्णालयासह मालेगाव सामान्य रुग्णालयातील 'मॉड्युलर आयसीयू'च्या उभारणीचे काम बनावट परवानाधारक कंपनीला देऊन सरकारची कोट्यवधींची आर्थिक फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार नाशिकमध्ये उघड झाला आहे.

कोविड काळातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक, मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यासह संबंधित अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या मावळत्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना दिले आहेत. जिल्हा रुग्णालयात या माध्यमातून सुमारे ११ कोटींचा घोटाळा झाला आहे. संबंधित कंपनीने राज्यात अनेक सरकारी रुग्णालयांचे टेंडर मिळविल्याने या घोटाळ्याची व्याप्ती ५० कोटींवर पोहोचण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे नाशिक जिल्हा रुग्णालयातील एका कर्मचाऱ्याची पत्नी आणि वडील संबंधित कंपनीचे समभागधारक असल्याचे पुढे आले आहे.

त्यामुळे संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जल्हा शल्यचिकित्सकांना दिले आहेत.

**• बनावट कंपनीला दिली ११ कामे**

केवळ मॉड्युलर आयसीयू उभारणीसाठी मंजूर निविदेच्या ५० टक्के म्हणजेच ३ कोटी ३७ लाख रुपये संबंधित बनावट कंपनीला अदा करण्यात आले. याशिवाय ईसीआरपीअंतर्गत व्हेंटिलेटर, होल्टर मॉनिटरसह विविध वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीसाठी १० निविदाप्रक्रिया राबवून त्यापोटी संबंधित बनावट कंपनीला जिल्हा रुग्णालयाद्वारे ७ कोटी ६५ लाख १७ हजार रकमेची देयके यापूर्वीच अदा करण्यात आली आहेत. त्यामुळे तब्बल ११ कोटी २ लाख रुपये या बनावट कंपनीला अदा केले गेले आहेत.

# भारतात दोन लाखांहून अधिक रुग्ण मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रतिक्षेत!



**• दरवर्षी हजारो रुग्ण योग्यवेळी अवयव न मिळाल्यामुळे मृत्युमुखी पडताहेत**

**वृत्तसंस्था । मुंबई**

भारतात दरवर्षी लाखो रुग्ण अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असतात, मात्र दात्यांची संख्या अत्यल्प असल्याने अनेकांना वेळेवर अवयव मिळत नाहीत परिणामी अवयवांच्या प्रतिक्षेतच बहुतेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागते. राष्ट्रीय अवयव व ऊतक प्रत्यारोपण संस्था (नोटो) च्या ताज्या आकडेवारीनुसार, सध्या देशभरात दोन लाखांहून अधिक रुग्ण मूत्रपिंडाच्या प्रत्यारोपणासाठी, तर ५० हजारांपेक्षा अधिक रुग्ण यकृतासाठी प्रतीक्षेत आहेत. त्याचप्रमाणे ८ ते १० हजार रुग्ण हृदयाच्या प्रत्यारोपणासाठी, आणि सुमारे १,५०० रुग्ण फुफ्फुसांसाठी तातडीने अवयव मिळण्याची वाट पाहत आहेत.

भारताचा अवयवदान दर अजूनही अत्यंत कमी असून तो फक्त ०.५ प्रति दशलक्ष लोकसंख्या आहे. तुलनेदाखल, स्पेनमध्ये हा दर ४९.६, तर अमेरिकेत ३६.१ आहे. ब्रेन-डेड दात्यांच्या माध्यमातून हृदय, यकृत, फुफ्फुस यांसारख्या अवयवांचे प्रत्यारोपण शक्य असते. मात्र अशा दात्यांची संख्या भारतात खूपच कमी आहे. २०२४ मध्ये संपूर्ण भारतात फक्त ७९० ब्रेन डेड दाते नोंदवले गेले, जे देशाच्या गरजांशी तुलना करता अत्यंत अपुरी संख्या आहे.

**अवयवदानात महाराष्ट्राची आघाडी**

महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घेतली असून गेल्या वर्षी १९८ ब्रेन डेड दाते नोंदवले गेले, हे देशातील सर्वाधिक असून त्यापाठोपाठ तेलंगणा (१२४), तामिळनाडू (११०) आणि कर्नाटक (८५) ही राज्ये आहेत. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमध्ये झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर्स (झेडटीसी) कार्यरत असून, ग्रीन कॉरिडॉरद्वारे अवयवांचे वेळीच वाहतूक करून प्रत्यारोपणास गती दिली जात आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये मुंबईत एका १६ वर्षीय मुलाच्या ब्रेन डेड अवस्थेनंतर त्याचे हृदय, दोन्ही मूत्रपिंड आणि यकृत यशस्वीपणे चार रुग्णांना प्रत्यारोपित करण्यात आले होते. एकट्या मुंबईचा विचार करता ४००० किडनी रुग्ण किडनी मिळण्याच्या (पान २ वर)

## संपादकीय

### उपराष्ट्रपतिपदाचे राजकीय गणित

जगदीप धनखड यांच्या अचानक उपराष्ट्रपती पदाच्या राजीनाम्यानंतर देशात नवीन उपराष्ट्रपती कोण होणार, ही चर्चा सुरू झाली आहे. भारतातील दुसऱ्या सर्वोच्च घटनात्मक पदावरून एका व्यक्तीचा राजीनामा ही महत्त्वाची घटना असून ती संविधानाच्या विशिष्ट तरतुदींनुसार हाताळली जाते. उपराष्ट्रपतिपद रिक्त झाल्यानंतर, संविधानाच्या अनुच्छेद ६८(२) नुसार, या पदाची निवड लवकरात लवकर करणे आवश्यक असते. या तरतुदीनुसार जर उपराष्ट्रपतींचा मृत्यू, राजीनामा किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे पद रिक्त झाले, तर त्या रिक्त जागेवर निवडणूक शक्य तितक्या लवकर घेणे बंधनकारक आहे. नवा उपराष्ट्रपती निवडून आल्यानंतर ते पदभार स्वीकारल्यापासून पुढील पाच वर्षे पदावर राहू शकतात. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनातच ही निवडणूक होण्याची शक्यता आहे. भारताचे उपराष्ट्रपती हे संसदेमधील दोन्ही सभागृहांमधील खासदारांच्या संयुक्त मतांनी निवडले जातात. संविधानाच्या अनुच्छेद ६६ मध्ये स्पष्ट केले आहे की, संसदेमधील दोन्ही सभागृहांचे सदस्य म्हणजे लोकसभा व राज्यसभेचे खासदार हे उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी मतदान करतात. यामध्ये मतदार त्यांचे क्रमवार प्राधान्य (प्रेफरन्स रँकिंग) नमूद करतात. मतपत्रिकेत उमेदवारांपुढे पहिली पसंती, दुसरी पसंती अशी मते नोंदवली जातात आणि सर्वाधिक प्रभावी पसंती मिळवलेला उमेदवार विजयी घोषित केला जातो. भारताच्या उपराष्ट्रपतिपदासाठी काही मूलभूत पात्रता निकष आहेत. या पदासाठी अर्ज करणारा उमेदवार भारताचा नागरिक असावा, त्याचे वय किमान ३५ वर्षे पूर्ण झालेले असावे, तसेच तो राज्यसभेचा सदस्य होण्यासाठी पात्र असावा. याशिवाय, उमेदवार केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा कोणत्याही स्थानिक प्रशासनाच्या अधीन कोणतेही लाभाचे पद त्याने धारण केलेले नसावे, या सर्व अटी भारतीय संविधानात स्पष्टपणे नमूद आहेत. राजीनाम्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात उपराष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत राज्यसभेची अध्यक्षपदाची जबाबदारी कोण सांभाळणार? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. संविधानात याबाबत स्पष्ट उल्लेख नसला तरी त्यांच्या अनुपस्थितीत राज्यसभेचे उपसभापती हा कार्यभार सांभाळतात. जर उपसभापतीही अनुपस्थित असतील, तर भारताचे राष्ट्रपती राज्यसभेतील कोणत्याही सदस्याला अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडण्यासाठी अधिकृत करू शकतात. या साऱ्या प्रक्रियेला संविधानिक स्वरूप दिलेले आहे आणि यामध्ये राजकीय हस्तक्षेप किंवा विलंबाची फारशी शक्यता राहात नाही. उपराष्ट्रपती हे भारताच्या घटनात्मक रचनेतील एक महत्त्वाचे स्थान आहे. ते राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत त्यांच्या अधिकारांची पूर्तता करत नाहीत, तर राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून त्यांची भूमिका संसदेत अत्यंत निर्णायक ठरते. त्यामुळे या पदासाठी होणारी निवडणूक ही केवळ राजकीयच नाही, तर घटनात्मक प्रक्रियेचा एक भाग ठरते. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडीसाठी संसदेतील पक्षीय बलाबल पाहिल्यास केंद्रातील सत्ताधारी 'एनडीए'कडे पुरेसे संख्याबळ असले, तरी विरोधक देखील मागे नाहीत. लोकसभेत ५४३ सदस्य आणि राज्यसभेत २४५ सदस्य आहेत. दोन्ही सभागृहाचे सदस्य उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मतदान करतात. राज्यसभेत भाजपचे ९९ खासदार तर घटक पक्षांना सामील करून घेतले तर ही संख्या १२९ पर्यंत पोहोचते. त्याचवेळी लोकसभेत भाजप एकट्या बळावर २४० खासदारांची क्षमता बाळगून आहे. 'एनडीए'ची आकडेवारी गोळा केली तर ही संख्या २९३ वर पोचते. दुसरीकडे लोकसभेत विरोधकांच्या बाकावर असलेल्या काँग्रेसकडे सर्वाधिक ९९ खासदारांचे बळ आहे. त्यांना दोन अपक्ष खासदारांचा पाठिंबा असून त्यांची एकूण संख्या १०१ आहे. विरोधकांच्या गटात २३५ खासदार आहेत. राज्यसभेत काँग्रेसचे २७ खासदार आहेत आणि 'इंडिया' आघाडीकडे ७७ खासदार आहेत.

# तळोदा येथे डम्पिंग ग्राऊंडमधील कचरा चिनोदा रस्त्यावर

## ● कचऱ्याची वाट न लावल्याने कुत्र्यांचाही त्रास; परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**प्रतिनिधी । तळोदा**

**येथील पालिकेच्या कचरा डेपोतील कचरा रस्त्यावर आल्याने नागरिकांना घाणीतूनच मार्गस्थ व्हावे लागत आहे. याकडे पालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने आजूबाजूच्या परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पालिका प्रशासनाने डेपोतील कचरा रस्त्यावर येणार नाही यासाठी उपाययोजना करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.**



पालिकेचा कचरा डेपो चिनोदा रोडवर स्थित आहे. हा रोड अत्यंत वर्दळीचा आहे. या डेपोच्या चारही बाजूस मोठ्या रहिवासी वस्त्या आहेत.

पालिकेच्या आरोग्य विभागाकडून कचरा संकलित करून तो कचरा डेपोत टाकण्यात येतो. परंतु कचरा हा डेपोत टाकल्यावर कचऱ्याची त्वरित विल्हेवाट होत नसल्याने मोकाट कुत्रे या कचरा डेपोत येऊन मोठ्या प्रमाणात उपद्रव करीत टाकलेला कचरा रोडवर आणून पसरवितात. याशिवाय, काही नागरिकही कचरा डेपोत व्यवस्थित न टाकता डेपोच्या दरवाज्यात कचरा फेकुन निघून जातात. नंतर हा कचरा हवेने व प्राण्यांमुळे हमरस्त्यावर येत असतो.

यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना अस्वच्छता, घाण व दुर्गंधीचा मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागतआहे. हल्ली पावसाळ्याचे दिवस असल्याने कचरा डेपोतील कचऱ्याचा दुर्गंध तुलनेने वाढला आहे. याडेपो लगतच्या दुकानदार व्यावसायिकांना दुर्गंधीचासामना करावा लागत आहे. पावसाळ्यात कचऱ्यापासुन सेंद्रिय खत निर्मिती मंदावते. परिणामतः मोठ्याप्रमाणावर कचरा साचून कुजतो. त्यामुळे कचऱ्याची दुर्गंधी वाढून नागरिकांना दुर्गंधी त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याव्यतिरिक्त साचलेल्या कचऱ्याला आग लागून परिसरात धूर पसरतो. यामुळे परिसरातील व्यावसायिकांना श्वास घेणेही कठीण होत असते. म्हणजे बाराही महिने आजूबाजूच्या नविन वस्तीतील नागरिकांना व दुकानदाराना कचरा डेपोचा त्रास होत आहे. यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत मात्र पालिका प्रशासन कोणतेही ठोस पाऊल उचलताना दिसत नाही.

पालिकेच्या आरोग्य विभागाने वेळोवेळी हा परिसर निर्जतूकीकरण प्रक्रियेने स्वच्छ करणे अपेक्षित आहे. परंतु याकडे पालिका प्रशासन दुर्लक्ष करतांना दिसत आहे. मात्र याचा अनिष्ट परिणाम परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. याचा पलिका प्रशासनाचे गांभीर्याने विचार करून कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावुन परिसरातील स्वच्छता अबाधित ठेवावी अशी मागणी होत आहे.

कचरा डेपोचा दरवाजा कायम उघडा राहत असल्याने मोकाट कुत्रे व गुरे डेपोचा आत जाऊन कचरा अस्ताव्यस्त करीत असतात. यावर नियंत्रण आणण्यासाठी कचरा डेपोवर पालिकेकडून वॉचमनची नेमणूक करणे आवश्यक आहे. अनेक दिवसांपासून या ठिकाणी कचरा, घाण व अस्वच्छता आहे. कचऱ्यावर योग्य प्रक्रिया योग्य कालमर्यादेत होणे आवश्यक आहे. असे झाले तर घाण व अस्वच्छता व दुर्गंधीला निश्चितच आळा बसेल. या बाबींकडे पालिका प्रशासनाने लक्ष देऊन उपाययोजना करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

ज्या वेळेस पालिकेचा कचरा डेपोची निर्मिती झाली त्यावेळेस शहरापासून ह्या कचरा डेपोचे अंतर १ कि.मी. पेक्षा अधिक होते. हळूहळू शहराची हद्द वाढ होवून शहराचा विस्तार वाढून जुन्या शहराचा आजुबाजूस नवीन वसाहती मोठया प्रमाणात वाढल्यात. आज हा कचरा डेपो शहरातील वस्तीत आला असून डेपोच्या चौफेर रहिवासी वस्त्या झाल्या आहेत. याअनुषंगाने पालिकेने नविन शहरापासून लांब नविन जागेत कचरा डेपो स्थलांतरित करावा अशी मागणी शहरवासियांकडून अनेक वर्षांपासून केली जात आहे. परंतू राजकिय इच्छाशक्तीअभावी हा प्रश्न अनुत्तरितच आहे. लोकप्रतनिधींनी याकडे लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पीएचडी मिळाल्याबद्दल डॉ. वैद्य यांचा सत्कार

**प्रतिनिधी । बोराडी**

येथील डॉ.बी.आर. आंबेडकर ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्यूकेशनच्या प्राचार्या सुचित्रा लक्ष्मण वैद्य यांनी धुळे जिल्ह्यातील आदिवासींच्या लोकसाहित्याचा अभ्यास या विषयावर पीएचडी संपादित केली आहे.प्राचार्या डॉ. सुचित्रा वैद्य यांना पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी प्राचार्य बी.डी. पाटील, सुनिल बहाळकर, जयश्री देवरे, बालविवाह प्रतिबंधक समितीचे सचिव सुनिता सगरे, पत्रकार अंबादास सगरे, गायत्री देवरे, प्रा. अरविंद भामरे, प्रा. उदय भलकार, प्रा. जे.एल. पावरा, लिपिक गणेश गोसावी आदी उपस्थित होते

## कामगार कार्यालयामार्फत कार्ड वाटप होत नसल्याने नागरिकांचा रास्ता रोको

**प्रतिनिधी । अक्कलकुवा**

कामगार कार्यालयातर्फे कामगार कार्ड वाटप होत नसल्याने संतप्त नागरिकांनी रास्तारोको व ठिय्या आंदोलन केले.

कामगार कार्यालयातर्फे अक्कलकुवा तहसील कार्यालयात कामगार कार्ड वाटप होणार असल्याने तालुक्यातील दुर्गम अतिदुर्गम भागातील महिला व नागरीकांनी तहसिल कार्यालयात पहाटेपासून गर्दी केली होती. सकाळी ११ वाजल्यानंतरही कामगार मंडळ कार्यालयामार्फत कार्ड वाटप होत नसल्याचे पाहून तहसील कार्यालयाच्या दरवाजासमोर नागरिकांनी ठिय्या आंदोलन केले. त्यानंतरही संतप्त झालेल्या महिलांनी तहसिल कार्यालयासमोर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील आंदोलनकर्त्या महिलांना समजावून सांगीतल्यावर साडे

११ वाजता रस्ता मोकळा करण्यात आला. यावेळी उपस्थितांची नायब तहसिलदार दिलीप गांगुर्डे यांनी समजुत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र तरीही त्यांनी तहसिल कार्यालयासमोरून उठुन पुन्हा दीड वाजेच्या सुमारास पुन्हा दुसऱ्यांदा तहसील कार्यालयासमोर महामार्गावर रस्ता रोको केले. कामगार मंडळातर्फे लेखी स्वरूपात आश्वासन मिळत नाही तोपर्यंत रस्त्यावर उठणार नाही असा पवित्रा महिलांनी घेतला. अखेर अडीच वाजेला कामगार मंडळ धुळेच्या मथुरा सुर्यवंशी यांचे लेखी पत्र नायब तहसीलदार दिलीप गांगुर्डे यांनी व भाजपा मंडळ अध्यक्ष आकाश वसावे यांनी वाचून संतप्त झालेल्या महिलांनी व नागरीकाची समजुत काढल्यानंतर सव्वा दोन ते अडीच वाजेदरम्यान संतप्त महिला व नागरीकांनी आंदोलन मागे घेतले.



कामगार मंडळातर्फे प्रभारी इन्चार्ज म्हणून रमेश पाडवी उपस्थित होते. मात्र कार्ड वाटप होत नसल्याने संतप्त महिला व नागरीक त्यांचे ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. कामगार मंडळाचे जबाबदार वरिष्ठ अधिकारी सकाळपासून लेखी आश्वासन सह येत नसल्याने महिला व आंदोलन कर्ते संतप्त झाले होते.

## पान १ वरुन

### शिंदेसेना सत्तेतून बाहेर......

जाऊ नये. सत्तेत समान वाटा मिळावा, अशा मागण्या शिंदे यांनी भाजप नेतृत्त्वाकडे केल्या, अशी माहिती सूत्रांनी दिल्याचं नमूद केलं आहे.माझ्या नेत्यांचा छळ थांबणार असेल तर शिवसेना सत्तेतून बाहेर पडेल आणि भाजप सरकारला बाहेरुन पाठिंबा देईल. सरकारमधून बाहेर पडण्याची शिवसेनेची तयारी आहे. अन्यथा लोकांचा भाजपच्या नेतृत्त्वावरील विश्वास उडेल. हा संदेश शिंदे यांनी बैठकीत अप्रत्यक्षपणे भाजप नेतृत्त्वाला दिला, असंही सूत्रांनी सांगितलं.

### शिंदे सेनेचा पुन्हा......

पैसे कसे उभे करायचे याचा डेमो महाराष्ट्र सरकारला दाखवला.आधी एका खासगी ॲपवरून बाईक बुक करायची मग गरीब बिचाऱ्या बाईकवाल्याला पकडायचे, ॲपवरून बाईक चालवणे नियमबाह्य आहे असा स्टंट करायचा, त्याचे व्हिडिओ बनवून परिवहन मंत्री किती स्मार्ट आणि अलर्ट आहेत, असा पीआर करायचा, स्वतःची इमेज बिल्डिंग करायची आणि मग अडचणीत आलेल्या या खासगी ॲपवाल्यांकडून इव्हेंटसाठी निधी मिळवायचा, किती छान आयडिया आहे ना, महाराष्ट्राच्या तिजोरीत खडखडाट असताना निधी कसा उभा करायचा, याचा आदर्शच प्रतापी मंत्र्यांनी घालून दिला. इव्हेंटसाठी पैसे उभे करायचे असेल तर मंत्र्यांना काय काय करावे लागते आहे. राज्याची आर्थिक स्थिती पाहता येणाऱ्या काळात विविध खात्यातील मंत्र्यांना देखील अशीच स्टंटबाजी करावी लागेल, असं चित्र आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

### कबुतरखान्यांवर बंदी कायम......

सार्वजनिक आरोग्याला प्राधान्य देत मुंबईतील कबुतराखाने बंद करत असल्याचे राज्य सरकारने जाहीर करताच पालिकेने कबुतरखान्यांविरोधात कारवाई सुरू केली होती. मात्र, महापालिकेच्या कारवाईविरोधात पक्षी प्रेमींनी मुंबई उच्च न्यायालयात मागितली होती दाद, तसेच जैन बांधवांनी देखील कबुतरखाने बंद केल्याने दादर परिसरात आंदोलन केल्याचं पाहायला मिळालं. मात्र, उच्च न्यायालयाने कबुतरखान्यांवर बंदी जाहीर करत पालिकेच्या कारवाईत अडथळा आणणाऱ्यांवर तसेच पक्ष्यांना खाद्य टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. याप्रकरणी दाखल याचिकेवर आज उच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यामध्ये, हायकोर्टाने कबुतरखान्यावरील बंदी कायम ठेवली असून एक्सपर्ट समिती स्थापन करण्याचे आदेशही दिले आहेत. कबुतरखाने बंद करण्यासंदर्भात न्यायालयाने समिती नेमण्याचे आदेश दिले असून या समितीत डॉक्टर असतील, याशिवाय याचिकाकर्त्यांचे मत घेतलं जाऊ शकतं.

### पायाभूत चाचणीची......

वतीने राज्यातील सर्व शासकीय तसेच निमशासकीय व अनुदानित शाळांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी परिषदेतर्फे पायाभूत चाचणी ६ ते ८ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

### भारतात दोन लाखांहून......

प्रतिक्षेत आहेत तर दोन हजार रुग्ण लिव्हर मिळण्याची वाट पाहात असल्याचे झेडटीसीसीचे अध्यक्ष व अवयवदान चळवळीतील अग्रणी डॉ भरत शहा यांनी सांगितले. अवयवदान मोहीमेला सरकारचा व्यपाक पाठिंबा मिळण्याची गरज असून ब्रेन डेड रुग्णांचे अवयव काढणाऱ्या रुग्णालयांची संख्या वाढविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. मुदलात अवयव प्रत्यारोपण करणाऱ्या रुग्णालयातच प्रामुख्याने अवयव काढण्याचे काम होते. अवयव काढण्यासाठी फार मोठ्या व्यवस्थापनाची आवश्यकता नसते हे लक्षात घेऊन जास्तीतजास्त सेंटरना सरकारने मान्यता देणे गरजेचे आहे. तसेच ज्या रुग्णालयांना अवयव काढण्याची मान्यता मिळालेली आहे, अशा रुग्णालयांमध्ये ब्रेन डेड पेशंट किती आहेत तसेच तेथे नेमके काम कसे होते, याचे ऑडिट नियिमत केले गेल्यास निश्चितपणे अवयवदानाचे प्रमाण वाढेल, असेही डॉ.भरत शहा यांनी सांगितले. अवयवदानाचे प्रमाण अत्यल्प - नोटो आणि केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अहवालानुसार, सध्या देशात प्रतीक्षा यादीत असलेल्या रुग्णांची एकंदर संख्या २.६ लाखांपेक्षा अधिक असून प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या अवयवांची संख्या फक्त १० टक्के आहे. यामध्ये मूत्रपिंडासाठी डायलिसिसवर असलेल्या हजारो रुग्णांचा समावेश असून, यकृत विकृती, हृदय निकामी होणे, किंवा श्वसनसंस्थेचे गंभीर आजार यामुळे देखील प्रत्यारोपण गरजेचे ठरते. २०१९ पासून सरकारने ङ्गराष्ट्रीय अवयवदान आणि प्रत्यारोपण कार्यक्रमांतर्गत नोंदणी, समन्वय आणि प्रशिक्षण यावर भर दिला आहे. मात्र अद्यापही देशात 'प्रिझ्युम कंन्सेट' प्रणाली लागू नाही. ही प्रणाली लागू झाल्यास, एखाद्या व्यक्तीने मृत्यूपूर्वी अवयवदानास विरोध केला नसेल, तर त्याचे अवयव वापरण्यास कायदेशीर परवानगी मिळू शकते. ही प्रणाली स्पेन, ऑस्ट्रिया, बेल्जियमसारख्या देशांमध्ये यशस्वी ठरली आहे. भारतात आजही 'अवयवदान म्हणजे जीवनदान' ही संकल्पना खऱ्या अर्थाने रुजलेली नाही. दरवर्षी हजारो रुग्ण योग्य वेळी अवयव न मिळाल्यामुळे मृत्युमुखी पडतात. हे चित्र बदलण्यासाठी केवळ सरकारी उपाययोजना नव्हे तर प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

## गुन्हेगारांच्या उदात्तीकरणाचे व्हिडिओ व्हायरल; तिघांवर गुन्हे

**प्रतिनिधी । धुळे**


सोशल मिडियावर गुन्हेगाराचे व गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे व्हिडीओ आणि पोस्ट व्हायरल केल्याप्रकरणी तिघांविरोधात धुळे जिल्हा पोलीस दलाने वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. सायबर पोलीस ठाण्याच्या सोशल मिडिया मॉनिटरिंग सेलच्या सतर्कतेतून ही कारवाई करण्यात आली.

धुळे शहर व परिसरातील सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर मयत गुन्हेगार रफिउद्दीन शेख आणि जामिनावरील विक्रम गोयर या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचे उदात्तीकरण करणारे व्हिडीओ व पोस्ट व्हायरल होत असल्याचे आढळून आले होते. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी संबंधीत अकाऊंटधारकांचा शोध घेवुन कायदेशीर कारवाईचे आदेश सायबर पोलीस ठाण्याला दिले होते. त्यानुसार जयप्रकाश देसले, अविस शेख व परवेज पठाण याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बोधकथा

### भोजन आणि मौन

कथा सिद्धार्थाच्या जीवनाशी निगडीत आहे. तेंव्हा ते बुद्धत्वाला गेले नव्हते आणि ते निरंजना नदीच्या काठी जंगलात वृक्षाखाली ध्यान करीत असत. सिद्धार्थ ध्यान केल्यानंतर जवळच्या गावात जावून भिक्षा मागून आणत असत. काही दिवसानंतर त्यांनी भिक्षा मागायला जाणे बंद केले. कारण एका गावात गावप्रधानाची छोटी मुलगी सुजाता त्यांना भोजन आणत असे. सिद्धार्थाना ती मोठ्या प्रेमाने भोजन देत असे. काही दिवसानंतर त्याच गावातला एक गुराखीही प्रभावित होवून सिद्धार्थांकडे येवू लागला. त्याचे नाव स्वस्ति होते. एके दिवशी सिद्धार्थ स्वस्तिबरोबर चर्चा करीत होते. तेवढ्यात सुजाता भोजन घेवून आली. भोजन सुरु करताच त्यांनी चर्चा बंद केली. भोजन संपेपर्यंत ते गप्पच होते. तेथे शांतता पसरली. स्वस्ति या सिद्धार्थांच्या वागण्याने हैराण झाला. त्याने सिद्धार्थांचे भोजन आटोपल्यावर विचारले,गुरुदेव ! मी आल्यानंतर आपण भरपूर चर्चा केली पण भोजनाच्या वेळी आपण एकही शब्द बोलला नाहीत, याचे कारण काय? सिद्धार्थ म्हणाले,भोजन निर्मिती मोठ्या कष्टाने होते. शेतकरी जमिनीची मशागत,



नांगरणी करतो, बी पेरतो, रोपांची देखरेख करतो, धान्य तयार होते. त्या धान्यासाठी आपण धन खर्चतो, धान्य घरी आल्यावर ते निवडून टिपून त्याचे सुंदर असे अन्न तयार होते. घरातील महिला सुग्रास असे भोजन तयार करते. इतक्या कष्टाने तयार झालेल्या अन्नाचा आनंद आपण शांततेने तेंव्हाच घेवू शकू जेंव्हा आपले मन शांत असेल. त्यामुळे माझे मन शांत राहण्यासाठी मी भोजन करताना शांत राहतो आणि त्यामुळे माझे मन शांत राहते आणि अन्नाचा अपमान न होता मी त्या कष्टाने मिळवलेल्या सुग्रास अन्नाचा आनंद घेवू शकतो.

**तात्पर्य :- शांततेत केलेले भोजन हे न केवळ भूक मिटविते तर मानसिक आनंद आणि सात्विक ऊर्जाही देते.**

## राशिभविष्य

**मेष :** आजचा काळ तुमच्यासाठी अनुकूल असेल. उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. कामाच्या ठिकाणी तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. सकारात्मक विचारसरणी ठेवा.

**वृषभ :** आज तुम्हाला व्यवसायात नवीन मित्र मिळतील. नोकरीत तुम्हाला पदोन्नती मिळू शकते. मित्रांसोबत पर्यटनस्थळी सहलीला जाऊ शकता.

**मिथुन:** आजचा दिवस काही चांगल्या बातम्यांनी सुरू होईल. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका. स्वतःवर विश्वास ठेवा.

**कर्क :** आज दिवसाची सुरुवात निरुपयोगी धावपळीने होईल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामासोबतच महत्त्वाची जबाबदारी मिळण्याचे संकेत आहेत.

**सिंह :** आज कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. परीक्षा किंवा स्पर्धेत यश मिळण्याचे संकेत आहेत.

**कन्या :** आज कामाच्या ठिकाणी संघर्ष वाढू शकतो. तुम्हाला काही अप्रिय बातम्या मिळू शकतात. व्यावसायिकांची परिस्थिती सुधारेल.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. कामे हळूहळू पूर्ण होतील. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका.

**वृश्चिक:** आज कामाच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठ सहकाऱ्यांशी अधिक समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न करा. व्यवसायात प्रगतीसोबतच नफाही होईल.

**धनु :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुम्हाला एखाद्या शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल. नोकरी मिळवण्याबाबत फोन येऊ शकतो.

**मकर :** आज तुमच्या नोकरीत एका चांगल्या अधिकाऱ्याशी जवळीक वाढेल. सरकारी मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**कुंभ :** बेरोजगारांना रोजगार मिळेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. राजकारणात तुम्हाला काही महत्त्वाची जबाबदारी मिळेल.

**मीन :** व्यवसाय क्षेत्राशी संबंधित लोकांना अचानक लाभ मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात आणखी काही संघर्ष होऊ शकतात. नोकरी करणाऱ्या लोकांना त्यांच्या कामात कठोर परिश्रम करावे लागू शकतात. नवीन कामाच्या योजना आखल्या जातील.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - राजेंद्र राधाकिसन शर्मा (मोबा. - ९४२२७८४३३६)** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### एकाच ठिकाणी काम, कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**जळगाव ।** एसटी महामंडळाच्या जळगाव विभागात आस्थापना, कामगार, लेखा, वाहतूक, स्थापत्य, सांख्यिकी शाखेत सहा वर्ष वा त्यापेक्षा अधिक काळ सेवारत असलेल्या कर्मचायांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये २४ लिपीक-टंकलेखक यांचा समावेश आहे. बदल्यांचे आदेश ६ ऑगस्टला जळगावचे प्रभारी विभाग नियंत्रक विजय गीते यांनी काढले आहेत. दिलेल्या पदावर तातडीने हजर टोण्याचे आदेश आहेत.

### मनीषा उगले मुख्य वैद्यकीय अधिकारी

**जळगाव ।** महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय घोलप यांना निलंबित केल्यानंतर त्यांच्या जागी जन्म, मृत्यू विभागाच्या प्रमुख डॉ. मनीषा उगले यांची नियुक्त झाली आहे. आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी याबाबतचे आदेश काढले असून घोलप यांना मुख्यालय न सोडण्याची तंबी देण्यात आली आहे. घोलप यांना जन्म-मृत्यू विभागात कंत्राटी पत्नीच्या जागी पती काम करीत असल्याच्या प्रकरणात निलंबित करण्यात आले असून, सहकारी महिलेचा लैंगिक छळ केल्याच्या प्रकरणाचा चौकशी अहवाल समितीने अजून सादर केलेला नाही, त्यामुळे या प्रकरणाची टांगती तलवार कायम आहे.

### इकरा महाविद्यालयात रसायनशास्त्र दिन साजरा

**जळगाव ।** एच. जे. थिम कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय रसायनशास्त्र दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम डॉ. प्रफुल्ल चंद्र रे यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आला. त्यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित एक लघुपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला, ज्यातून त्यांचे वैज्ञानिक योगदान आणि राष्ट्रप्रेम यांचा परिचय मिळाला. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. चाँद खान होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. वकार शेख, डॉ. तन्वीर खान व रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. साजिद मलक, तसेच विभागातील प्रा. डॉ. मुस्ताकीम शरीफ, डॉ. अख्तर शाह, व भूगोल विभागाचे डॉ. अमीन काझी, डॉ. इरफान शेख उपस्थित होते.

# जागृत स्वयंभू ; अर्ध नारेश्वर महादेवाला गिरणेच्या पाण्याने अभिषेक

## • सुख अमृतनगर, सोनी नगरातील भाविक 'चल रे कावरीया भरके घगरीया' गाण्यावर थिरकली पाऊले

प्रतिनिधी । जळगाव

**कावड यात्रा ही भगवान शंकराप्रती असलेल्या भक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. कावडीया आपली कावड खांद्यावर घेऊन पायदळ चालतात आणि त्यात असलेले पवित्र जल शंकराच्या पिंडीवर अर्पण करतात.**



पिंप्राळा परिसरातील जागृत स्वयंभू महादेव, व सुख अमृत नगरातील अर्धनारेश्वर महादेव या मंदिरावर कावड यात्रेकरूनी सावखेडा येथून गिरणा नदीतून तांब्याच्या पात्रता पाणी आणून शंकराच्या पिंडीवर ५०० लिटर जल अर्पण केले.

सुरुवातीला सावखेडा गिरणा नदी जवळ वाळूची पिंड करून पूजा करण्यात आली त्यानंतर गिरणा नदीची पूजा व आरती करून महिला भाविकांनी तांब्याच्या पात्रता पाणी भरले.त्यानंतर सुख अमृत नगर व सोनी नगरातील भाविक चल रे कावरीया भरके घगरीया गाण्यावर थिरकली.

सोनी नगरातील जागृत स्वयंभू महादेव मंदिर परिसरातून बुधवारी दुपारी २.३० वाजता कावड यात्रा सावखेडा येथील गिरणा नदी तेथून आपापल्या मंदिरात शंकराच्या पिंडीवर गंगाजल अर्पण केले.जागृत स्वयंभू महादेव व अर्ध नारेश्वर पिंडीवर ५०० लिटर गंगा जल अर्पण करून अभिषेक करण्यात आले.

सोनी नगरातील मनोकामना पूर्ती जागृत स्वयंभू महादेव मंदिराचे हे दुसरे वर्ष असून गंगाजल हे पवित्र मानले जाते. कावड यात्रेदरम्यान ते शंकराच्या पिंडीवर अर्पण केल्याने वातावरणाची पवित्रता वाढते, असे नरेश बागडे यांनी सांगितले.

५ किलोमीटर भर उन्हातून कावड यात्रा सोनी नगर येथून सावखेडा गिरणा नदी अडीच किलोमीटर असून परतताना अडीच किलोमीटर असे ५ किलोमीटर भाविक पायदळ कावड यात्रेत सहभागी झाले होते. सुख अमृत नगरातील अर्ध नारेश्वर महादेव मंदिर येथील महिला भाविकांनी खांद्यावर व डोक्यावर स्टील काळशीत व तांब्याच्या पात्रात गंगा जल आणून अर्ध नारेश्वर शंकराच्या पिंडीवर अर्पण केले. असे मानले जाते की, कावड यात्रा केल्याने भगवान शंकर प्रसन्न होतात आणि भक्तांच्या मनोकामना पूर्ण करतात. विशेषतः श्रावण महिन्यात कावड यात्रा केल्याने लवकर फलप्राप्ती होते. सर्व भाविकांनी गंगाजल शंकराच्या पिंडीवर अर्पण केले त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता महाआरती कावड यात्रेत सहभागी झालेल्या भाविक व आशिष सपकाळे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नरेश बागडे, मधुकर ठाकरे, विलास निकम, श्रीकृष्ण मेंगडे, विनोद निकम, सरदार राजपूत, डॉ. कमोलखी सरकार, पंकज राजपूत, श्यामलता सरकार, अनिता कापुरे, ओमकार जोशी, उदय महाले, मनोज मेंगडे, सुख अमृत नगरातील महिला मंडळ, यांनी परिश्रम घेतले.

**७५ वर्षाची वयोवृद्ध मंगला बारी या आजीबाईने कावड खांद्यावर घेऊन सकाळी ८ वाजता ५ किलोमीटर एकटी पायदळ भर उन्हात चटके सहन करत हर हर महादेव, बम बम भोले चा जय घोष करत पिंप्राळा येथील रथ चौकातील महादेव मंदिरात दुपारी ११.३० वाजता शंकराच्या पिंडीवर गंगाजल अर्पण केले. सोनी नगरातील कावड यात्रेत महिलांनी कावड यात्रा सजवून खांद्यावर घेत हर हर महादेव, बोल बम का नारा है बाबा हमारा सहारा है भर उन्हात ही कावड यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

# दिल्लीचा अरिहत कपिल सातव्या फेरीपर्यंत अव्वल

## • राष्ट्रीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेतील खेळाडूंच्या पालकांशी निशा जैन यांचा संवाद; दुसऱ्या सत्राचे ऐश्वर्या रेड्डी यांच्याहस्ते सुरुवात

प्रतिनिधी । जळगाव

जैन हिल्सच्या अनुभूती मंडपम येथे सुरु असलेल्या ३८ राष्ट्रीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा सातव्या फेरीपर्यंत अटितटीत आली आहे. दिल्लीचा अरिहत कपिल याने पहिल्या सामन्यापासून आतापर्यंत सात पैकी सात सामने जिंकून मुलांमध्ये अव्वल स्थानावर आघाडी घेतली आहे. अरिहत कपिल ने महाराष्ट्राच्या अविरत चौहान याला धक्कादायक पद्धतीने नमविले. त्यामुळे त्याला एकल बढत घेता आली. दुसऱ्या पटावर तेलंगणाचा इशान कंदी व पश्चिम बंगालचा नरेंद्र अग्रवाल यांच्यात बरोबरीत सामना झाला. महाराष्ट्राच्या अद्वित अग्रवाल याने ओणीक्षूक मंडल यांच्यामध्ये बरोबरीत सामना झाला.



**मुलींच्या गटात सहा गुणांसह सात खेळाडूंचे वर्चस्व**

३९२ मुलं व १७७ मुलींचा समावेश असलेल्या या स्पर्धेतील मुलींच्या गटात पहिल्या बुद्धिबळ पटावर दिवी बिजेस आणि जानकी एस डी दोघं केरळ यांच्या अटितटीचा सामना होऊन बरोबरीत झाला. झारखंडची दिशीता डे हिने आरध्या दास त्रिपूरा हिच्यासोबतचा सामना बरोबरीत झाला. महाराष्ट्राची क्रिषा जैन व भूमिका बांधले यांच्यात तिसऱ्या पटावर सामना रंगला त्यात क्रिषा जैनने बाजी मारली. सुमिता पुनगावन तेलंगणा हिने मान्या ड्रोलिया गुजरात हिला नमवून आपले वर्चस्व कायम ठेवले. महाराष्ट्राची प्रिशा घोलप हिने कर्नाटकची नक्षत्रा गोमूदवेली हिला नमविले. मुलींच्या गटात सहा गुणांसह सात खेळाडू आघाडीवर आहेत.

आजच्या सकाळच्या सत्रात अनुभूती स्कूलच्या संचालिका निशा अनिल जैन यांनी सांगितले की, तुम्ही विविध ठिकाणांवरुन येथे आला आहात. खेळताना विजय आणि पराभवाचा विचार करु नका. खेळाचा पुरेपुरे आनंद घ्या. फक्त खेळताना आपले शंभर टक्के योगदान द्या. असा खेळाडूंशी संवाद साधला. यानंतर पालकांशी व्यवस्थेविषयी चर्चा केली. राष्ट्रीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेनिमित्त करण्यात आलेल्या व्यवस्थेविषयी पालकांनी समाधान व्यक्त करीत जैन हिल्सच्या निसर्गरम्य परिसराचे कौतूक केले. यानंतर पालकांनी अनुभूती स्कूल ला सुद्धा भेट दिली.

दुपारचे सत्र ऐश्वर्या रेड्डी यांच्या प्रमूख उपस्थितीत सुरू करण्यात आले, यावेळी बौद्धिक एकाग्रता वाढविण्यासाठी बुद्धिबळ खेळ खूप मोलाचा असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी जैन इरिगेशनचे मिडीया व्हाईस प्रेसिडेंट अनिल जोशी, नाशिकचे वरिष्ठ प्रशिक्षक सुनील शर्मा, पंच दीपक चौहान, पुण्याच्या जुईली कुलकर्णी उपस्थित होते.

# शैक्षणिक क्षेत्रामधील कर्मचाऱ्यांना ईएसआय लागू

प्रतिनिधी । जळगाव

राज्य सरकारने कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ चा विस्तार राज्यातील शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्थांपर्यंत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे आता शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, नर्सिंग होम्स आणि डायग्नोस्टिक सेंटर्समधील कर्मचाऱ्यांना ईएसआयच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा (वैद्यकीय, आजारपण, प्रसूती, अपंगत्व) लाभ घेता येणार आहे.

खान्देशात ५० हजार पेक्षा जास्त जणांना या नियमाचा फायदा होणार आहे. हा निर्णय २८ ऑगस्ट २०२५ पासून लागू होणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने यासंदर्भात नुकतीच एक अधिसूचना जारी केली असून, ज्या शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्थांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांना या कायद्याचे पालन करणे बंधनकारक असेल. यामध्ये सरकारी, खासगी, अनुदानित किंवा कोणत्याही ट्रस्ट, सोसायटीद्वारे चालविल्या जाणाऱ्या संस्थांचा समावेश आहे.



# भाजपा संघटनात्मक मंडळ कार्यशाळेची बैठक

प्रतिनिधी । जळगाव

हर घर तिरंगा, रक्षाबंधन व विभाजन विभीषिका दिवस अभियान निमित्ताने संघटनात्मक मंडळ कार्यशाळेची मंगळवार दि ५ रोजी दुपारी ३ वाजता भाजपा जिल्हा कार्यालय (जी.एम. फाऊंडेशन) येथे संघटनात्मक मंडळ कार्यशाळेची बैठक घेण्यात आली होती.

कार्यक्रमाची सुरुवात मंडळ क्रमांक ३ चे उपाध्यक्ष योगेश वाणी यांना श्रद्धांजली अर्पित करून करण्यात आली.

यावेळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, माजी महापौर सीमा भोळे, उपाध्यक्ष नितीन इंगळे, रक्षाबंधन महानगर संयोजिका व माजी महापौर भारती सोनवणे, हर घर तिरंगा अभियानचे महानगर संयोजक जयेश भावसार, विभाजन विभीषिका दिवस अभियान महानगर संयोजक प्रकाश बालानी, मंडळ अध्यक्ष दीपमाला मनोज काळे, युवा मोर्चा अध्यक्ष महेश पाटील, माजी मंडळ अध्यक्ष शक्ती महाजन, गोपाल पोपटानी, प्रदेश महिला मोर्चा चिटणीस रेर्खा वर्मा, शुचिता हाडा, मंडळ सरचिटणीस विनय सुरेश केसवाणी, रवींद्र पांडुरंग सोनवणे, सचिन राजेंद्र बाविस्कर, शरद बाविस्कर, पंकज गागडे, अमित काळे, प्रमोद वाणी, संजय अडकमोल, सतीश पाटील, हेमंत जोशी, निलेश जोशी, सागर पोळ, माधुरी हांडे, नितु परदेशी, सुमन मराठे, उषा परदेशी, दीपिका खैरनार, रत्ना बागुल, अपर्णा भालोदकर, गीता नागला, शुभांगी बीऱ्हाडे, सविता बोरसे, संदीप पाटील, शुभम बावा, मनोज सोनवणे, नंदिनी राणा, मंगला चौधरी, गायत्री राणे, नील चौधरी, रेखा राणा, मनोज काळे, अविनाश भोळे, हेमंत चौधरी, नीरज पाटील, दिनेश प्रजापत यांच्यासह भाजपाचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळ सरचिटणीस विनय सुरेश केसवाणी व आभार प्रदर्शन शुचिता हाडा यांनी केले.

# मुख्यमंत्र्यांनी विमानतळावरच घेतली प्रशासकीय माहिती

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव जामोद (बुलढाणा) येथील दौरा आटोपून मुख्यमंत्री बुधवारी सायंकाळी हेलिकॉप्टरने जळगाव विमानतळावर दाखल झाले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांसह सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाच मिनिटांत धावती माहिती घेतली. आणि विशेष विमानाने मुख्यमंत्री मुंबईकडे रवाना झाले.

यावेळी मंत्री गिरीश महाजन, आ. राजूमामा भोळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी उपस्थित होते. आमदार भोळेंनी रा. स्व. संघावर आधारित पुस्तक देऊन मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. त्यानंतर प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांनी स्वागत केले. सुरुवातीला आ. भोळेंनी रस्त्यांच्या कामांसाठी १०० कोटींच्या निधीसाठी मागणीपत्र दिले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना आढावा सादर केला.

# नूतन मराठा महाविद्यालयात मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन

प्रतिनिधी । जळगाव

नूतन मराठा महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे सकारात्मक मानसिक आरोग्य या विषयावर व्याख्यान झाले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मानसोपचार डॉ. कांचन नारखेडे, डॉ. ज्योती पाटील, डॉ. दौलत निमसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतांना कोणत्याही गोष्टीचे दडपण न घेता सकारात्मक पद्धतीने आनंदी आयुष्य जगावे, याकरिता दैनंदिन जीवनशैली कशी असावी याबाबत विद्यार्थ्यांनी तज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. एल.पी. देशमुख, उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, पर्यवेक्षक प्रा.डी.वाय. पाटील, पर्यवेक्षक प्रा.पी.बी. लोंढे, प्रा. आर. डी. कोल्हेकर, प्रा. एन.आर. कुसुंबे उपस्थित होते. मार्गदर्शन कार्यक्रमानंतर प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यबाबत वेगवेगळ्या शंकांचे निरसन करण्यात आले. निकोप मानसिक आरोग्यासाठीच्या उपाययोजना सुचविल्या. कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. नूतन पाटील यांनी केले तर प्रा. दिलराज पाटील यांनी आभार मानले.

# २६ फूट उंचीची गणपती मूर्ती येणार

प्रतिनिधी । जळगाव

शिवमुद्रा बहुद्देशीय मित्रमंडळ आणि सार्थक सिद्ध सेवा फाउंडेशन यांच्या वतीने सत्यम रेसिडेन्सी आणि पवार पार्क परिसरात दि.१२ रोजी २६ फूट उंचीच्या गणपती बाप्पांच्या आगमन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हा सोहळा होईल. यासाठी नियुक्त कार्यकारिणी अध्यक्षपदी आकाश भालेराव, उपाध्यक्ष वरुण मैराळे, खजिनदार हितेश पाटील, मल्हार पाटील,



सचिव समाधान पाटील, निखिल नेरकर, मयूर चौधरी, गणेश कुंभार आणि सल्लागार कार्तिक परदेशी, शिव पवार, अक्षय चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# जैन इरिगेशनला 'टाइम्स ऑफ इंडिया इकोप्रेन्योर' सन्मान

## • शाश्वत शेती, जैवविविधता संवर्धन, पाणी व्यवस्थापनातील दीर्घकालीन नेतृत्वासाठी अथांग जैन यांनी स्वीकारला पुरस्कार

प्रतिनिधी । जळगाव

दिल्ली येथील इरॉस हॉटेलमध्ये टाइम्स ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या शानदार समारंभात जैन इरिगेशन सिस्टम्स लिमिटेडला टाइम्स ऑफ इंडिया इकोप्रेन्योर - २०२५ पुरस्कार सन्मानाने गौरविण्यात आले. कंपनीच्या शाश्वत शेती, जैवविविधता संवर्धन, पाणी व्यवस्थापनातील दीर्घकालीन नेतृत्व यासाठी नुकताच हा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात कंपनीच्यावतीने जैन फार्म फ्रेश फुडस्चे संचालक अथांग अनिल जैन यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

जैन इरिगेशनच्या २,५०० एकरांहून अधिक क्षेत्रातील एकात्मिक पाणलोट विकास कार्याची, ज्यात मृदासंवर्धन, वृक्षारोपण, पावसाचे पाणी साठवण आणि भूजल पुनर्भरण संरचना या महत्त्वपूर्ण कामांचा समावेश आहे. कंपनीने जागतिक पातळीवर ठसा उमटविलेल्या या कार्याला अधोरेखित करून ह्या पुरस्कारासाठी निवडले आहे. जैन इरिगेशनच्या कृषी-तंत्रज्ञान उपाययोजनांनी भारत आणि जागतिक स्तरावर एक कोटीहून अधिक छोट्या शेतकऱ्यांना सक्षम बनविले आहे. ज्यामुळे शाश्वत शेती तंत्रज्ञान पद्धतींचा अवलंब, उत्पादकता वाढ आणि दीर्घकालीन नफा मिळवणे शक्य झाले आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी कंपनीचे



ठिबक व सूक्ष्मसिंचनाचे अग्रगण्य काम आहे. जैन इरिगेशनच्या उत्पादनांनी १४३ अब्ज घनमीटर पाण्याची बचत, २६,३९५ गिगावॅट तास ऊर्जेची बचत आणि १९ दशलक्ष टन कार्बन समकक्ष उत्सर्जन कमी केले आहे. पाणी आणि पोषक द्रव्ये थेट झाडांच्या मुळापर्यंत पोहोचवून, पर्यावरण पुरक ठरतात, उत्पन्न वाढवतात आणि मातीचे आरोग्य टिकवतात.

पर्यावरणीय जबाबदारीची ही बांधिलकी लँडस्केप आणि समुदायांपर्यंत विस्तारली आहे. गिरणा नदीवरील कांताई बंधाऱ्यासारख्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांनी १,२०० हून अधिक शेतकरी कुटुंबांना आणि जवळपास ४,००० एकर शेतजमिनीला सिंचन सुविधा उपलब्ध झाली आहे, तसेच ग्रामीण प्रवेश आणि वाहतूक सुधारली आहे. कंपनीच्या संवर्धन क्षेत्रात आता ८०० हून अधिक प्रजातींचा समावेश आहे, ज्यात वूल्ली-नेक्ड स्टॉर्क आणि युरोपियन रोलर यांसारख्या २१ जवळपास धोक्यात असलेल्या पक्षी आणि प्राण्यांचा समावेश आहे. यासोबतच, जैन इरिगेशनच्या प्रसार कार्यक्रमांनी २२ गावांमध्ये ७५,००० हून अधिक सीड बॉल आणि रोपांचे वितरण केले आहे, ज्यामुळे पर्यावरणीय जागरूकता आणि सामायिक जबाबदारीची संस्कृती वृद्धिंगत केली.

## थोडक्यात

### महसूल सप्ताहात वृक्ष लागवड

**पारोळा ।** महसूल सप्ताह अंतर्गत पारोळा तालुक्यात वृक्ष लागवड कार्यक्रम साजरा करण्यात आला. यासाठी पारोळा तालुक्यातील सर्व मंडळ भागात आयोजन करण्यात आले होते. पारोळा मंडळ भागात उंदिरखेडा शिव रस्त्यावर वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी तहसीलदार डॉ. उल्हास देवरे, मंडळ अधिकारी शेखर तडवी, ग्राम महसूल अधिकारी निशिकांत माने, आदित्य परदेशी, शशिकांत परदेशी, सरपंच गणेश पाटील, पोलीस पाटील, सागर नेतकर, निवडणूक नायब तहसीलदार शांताराम पाटील, रवींद्र देशमुख, राजाराम निळकंठ बोरसे, शिपाई नवनाथ पाटील, चालक कैलास माळी व ग्रामस्थ उपस्थित होते. यापूर्वी देखील उंदीरखेडा येथे रोपवाटिका तयार करून वृक्ष वाटप केल्याचे उपस्थित ग्रामस्थ यांनी नमूद केले.

### चोरीच्या घटनांनी शेतकरी धास्तावले

**मुक्ताईनगर ।** तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सुकळी गावातून एकाच रात्री २० शेळ्या आणि शेतातून ठिंबक नळ्यांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनांमुळे परिसरातील शेतकरी धास्तावले असून, पोलिसांनी चोरांचा त्वरित बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे. सुकळी येथील संजय भागवत पाटील यांच्या बंदिस्त गोठ्यातून सुमारे २० शेळ्या चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास पळवून नेल्या. त्याच रात्री, संदीप रामकृष्णा चौधरी यांच्या शेतातील नवीन केळी लागवडीसाठी ठेवलेल्या ठिंबक नळ्याही चोरट्यांनी लंपास केल्या. या दोन्ही घटनांनी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

### धरणगावात कुस्त्यांची दंगल

**धरणगाव ।** येथे शंभर वर्षाचे परंपरा असलेल्या श्री व्यायाम प्रसारक मंडळ संस्थेतर्फे श्रावण महिन्यामध्ये मरीआईच्या यात्रेनिमित्त ५ रोजी कुस्त्यांच्या दंगल आयोजित केली होती. त्यात बाहेरगावाहून पहेलवान आले होते. या दंगलींमध्ये राज्यभरातून मुले येत असतात . त्यात युवतींच्या सुद्धा सहभाग असतो. या शंभर वर्षाच्या परंपरा असलेल्या व्यायाम प्रसारक मंडळाच्या दर मंगळवारी कुस्त्या भरतात. यावेळेस धरणगाव शहरातील व जिल्ह्यातील विविध मान्यवर होते. धरणगाव येथील जिल्हा शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हा प्रमुख व माजी नगराध्यक्ष पी.एम. पाटील यांच्या हस्ते आखाड्याचे पूजन करण्यात आले. पी.एम. पाटील यांच्यासह माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, जीवन आप्पा बयस, भगीरथ माळी तसेच पोलीस विभागाच्या मान्यवरांकडून विविध मल्लांच्या कुस्त्या लावण्यात आल्या.



# पाळधी येथील १५ भाविक सुखरुप

## ● गावी परत आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू

**प्रतिनिधी । जळगाव**

उत्तराखंड येथे झालेल्या ढगफुटीमुळे देशभरातील अनेक भाविक त्याठिकाणी अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. जळगाव जिल्ह्यातील पाळधी येथील १५ भाविक अडकल्याची माहिती होती. दरम्यान, त्या भाविकांशी संपर्क झाला असून सर्व सुखरुप असल्याची माहिती पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली आहे.दरम्यान, त्यांना गावी परत आणण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.


राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी एक मोठी आणि दिलासादायक बातमी दिली आहे. उत्तराखंडमधील नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकल्याची भीती असलेले पाळधी गावातून गेलेले सर्व १५ पर्यटक सुरक्षित आहेत. गेल्या ३६ तासांपासून त्यांच्याशी संपर्क तुटला होता. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र, आता हे सर्वजण सुरक्षित असल्याची खात्री खुद्द पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली आहे.

या सर्व पर्यटकांना गंगोत्रीपासून काही अंतरावर असलेल्या भारतीय लष्कराच्या बेस कॅम्पमध्ये ठेवण्यात आले आहे. तेथे त्यांची काळजी घेतली जात आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या गावी परत आणण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. त्याठिकाणी रस्ते वाहून गेल्याने सध्या कुणीही बाहेर पडू शकत नाही. तसेच नेटवर्क नसल्याने संपर्क साधण्यास अडचण येत असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी फोनवरून दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसात या सर्व पर्यटकांना महाराष्ट्रात आणण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत केली जाईल. यामुळे पर्यटकांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेली काळजीची लाट आता शांत झाली असून, सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

**उत्तराखंड आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाशी सतत संपर्क**

जळगाव जिल्हा प्रशासन उत्तरकाशी जिल्ह्यातील अधिकाऱ्यांशी तसेच उत्तराखंड राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाशी सतत संपर्कात आहे. या संपूर्ण परिस्थितीवर जळगाव जिल्हाधिकारी स्वतः बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

पालकमंत्री गुलाबराव पाटील व खा. स्मिता वाघ हे सध्या दिल्लीत असून, महाराष्ट्राचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यासमवेत केंद्र व राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांशी समन्वय साधण्यासाठी आवश्यक त्या सर्व स्तरांवर प्रयत्नशील आहेत. ज्या नागरिकांबाबत अद्याप संपर्क झालेला नाही, असे वृत्त आहे, ते सर्वजण सुरक्षित असावेत आणि त्यांच्या कुटुंबियांना या कठीण काळात मानसिक बळ मिळावे, अशी प्रार्थना आम्ही करत आहोत. उत्तराखंड सरकार व भारत सरकार यांच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा घटनास्थळी सतत कार्यरत असून, बचाव व मदत कार्यात कोणतीही कसूर ठेवली जात नाही. आपल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत. कृपया संयम बाळगा, योग्य माहितीच्या प्रतीक्षेत रहा आणि अफवांवर विश्वास ठेवू नका,असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष पप्रसाद यांनी केले आहे.



## ● उत्तरकाशीत अडकलेले जळगावचे रूपेश मेहरा कुटुंबासह सुखरूप

उत्तरकाशी येथे झालेल्या ढगफुटीमुळे अनेक पर्यटक अडकले होते. यामध्ये जळगावमधील अयोध्यानगरातील मेहरा कुटुंबातील अनामिका मेहरा, आरोही मेहरा आणि रुपेश मेहरा यांचाही समावेश होता. काही काळ संपर्क न झाल्याने कुटुंबात चिंतेचे वातावरण होते. मात्र, जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेमुळे संबंधित तिघेही माउंट भगीरथी होमस्टे, हर्षिल येथे सुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे.

या भाविकांचे वडील चंद्रशेखर नरवरिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार स्टे हाऊसच्या व्यवस्थापकांशी थेट संपर्क साधण्यात आला. तेव्हा तिघेही भाविक सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले. केवळ नेटवर्क अभावामुळे संपर्क तुटलेला होता. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने ही माहिती मेहरा कुटुंबास कळवली असून त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. उत्तरकाशीमधील धराली परिसरात झालेल्या ढगफुटीमुळे खीरगंगा नदीला मोठा पूर आला आहे. जळगावसह इतर जिल्ह्यांतील पर्यटक सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन केंद्राने दिली आहे. संपर्क तुटलेल्यांशी थेट संवाद होईपर्यंत नातेवाईकांची चिंता वाढली होती. दरम्यान, उत्तराखंडमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना मदतीसाठी राज्य शासनाने तातडीने पावले उचलली आहेत. पर्यटकांना सुरक्षितस्थळी हलवण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे.

# उत्तराखंडमध्ये अडकलेल्या जिल्ह्यातील १६ भाविकांसाठी पालकमंत्र्यांचा पाठपुरावा

## ● दिल्लीमार्गे सुटकेची व्यवस्था केली जाईल

**प्रतिनिधी । जळगाव**

उत्तराखंडमधील अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे अडकलेल्या जळगाव जिल्ह्यातील भाविकांना सुखरूप दिल्लीमार्गे जळगावला परत आणण्यासाठी राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक घेऊन तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत.

या बैठकीस स्मिता शेलार, आशुतोष दिवेदी (सहाय्यक निवासी आयुक्त), व्यवस्थापक प्रमोद कोलपते हे उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री पाटील यांनी उत्तराखंड राज्याचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांचे खासगी सचिव हिमांशू यांच्याशी थेट संवाद साधून भाविकांच्या सुरक्षिततेबाबत पूर्ण सहकार्य आणि लवकरात लवकर दिल्लीमार्गे सुटकेची व्यवस्था केली जाईल, असे आश्वस्त केले. पालकमंत्री गुलाबराव पाटील हे कालपासून दिल्लीमध्येच तळ ठोकून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत आहेत. त्यांनी जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याशी नियमित संपर्क ठेवून राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग, रेल्वे प्रशासन व इतर यंत्रणांशी समन्वय सुरु केला आहे. जळगाव जिल्ह्यातील पाळधी (ता. धरणगाव) येथील १३ तरुण आणि जळगाव येथील एका कुटुंबातील ३ व्यक्ती सध्या उतराखंडमधील हर्षिलजवळील भगिरथी होमस्टे, बागोरी येथे अडकले आहेत. या भाविकांमध्ये रोहन दिनेश माळी, रोहील बंडू माळी ,मनोज संजय चौधरी, ज्ञानेश्वर संजय माळी, दीपक रत्नाकर सोनार, सुखदेव नन्नवरे, दीपक माळी, वैभव गंगवणे, संदीप माळी, विशाल पाटील,रिवेश माळी, भूषण माळी, पवन माळी तर जळगाव शहरातील अनामिका मेहरा, त्यांची कन्या आरोही मेहरा आणि पती रुपेश मेहरा हे सर्व भाविक सुरक्षित असून या सर्व भाविकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू असून, त्यांच्या सुटकेसाठी उत्तराखंड प्रशासन व दिल्लीतील महाराष्ट्र सदनमार्फत तातडीच्या उपाययोजना केल्या जात आहेत. सरकार आपल्यासोबत आहे. सर्व यंत्रणा कार्यरत असून भाविकांना सुखरूप परत आणले जाईल,असा धीर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिला.



## कबड्डी खेळाडूंचा सन्मान...



जळगाव :– स्व. बबनभाऊ बाहेती जयंतीनिमित्त जळगाव जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात आला. ठाकरे कबड्डी चषक आयोजन समितीचे प्रशांत सुरळकर, माजी कबड्डी खेळाडू बन्सी माळी, सुनील राणे यांचा आ. प्रा चंद्रकांत सोनवणे, आ. राजूमामा भोळे यांनी सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला. तसेच कबड्डी खेळाडू व कार्यकर्त्यांचे सन्मान चिन्ह देऊन गौरव केला. यावेळी प्रा.नारायण खडके, मोहन भावसार, श्याम कोगटा, रोहन बाहेती, बंडू काळे आदी उपस्थित होते.

# मंदिरातून साहित्य चोरून पळताना पोलिसांचा सिनेस्टाईल पाठलाग !

**प्रतिनिधी । अमळनेर**

तालुक्यातील पाडसे येथील एकवीरा मातेच्या मंदिरातून १५ किलो वजनाची तांब्याची घंटा व इतर साहित्य चोरी करुन पळणाऱ्या चोरट्यांचा पाळधी दूरक्षेत्राच्या पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग केल्याची घटना दि. ४ रोजी मध्यरात्री २ ते २:३० वाजेच्या सुमारास घडली. चोरट्यांकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले. संशयित आरोपी दि. ४ रोजी मध्यरात्री १ ते १:३० वाजेच्या सुमारास दोघेजण दुचाकीवरून आले. पाडसे येथील एकवीरा मातेच्या मंदिरातून सुमारे १५ किलो वजनाची तांब्याची घंटा, एक लहान घंटा, त्रिशूल व तांब्याचा ताट आदी वस्तू चोरून जळगावच्या दिशेने निघाले. मध्यरात्री २ ते २:३० वाजेच्या सुमारास ते पाळधी शिवारात पोहचले असता त्याठिकाणी गस्त घालणारे हवालदार संघपाल तायडे आणि पोकॉ. भरत पाटील यांना त्यांच्यावर संशय आला आणि त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र ते न थांबता दुचाकीचा वेग वाढवत जळगावच्या दिशेने निघाले. लागलीच पोह. संघपाल तायडे, पोकॉ. भरत पाटील यांनी सरकारी वाहनाने दोघांचा पाठलाग केला. सुमारे ४ ते ५ किमी पाठलाग केल्यानंतर महामार्गालगत पोलिसांनी चोरट्यांच्या दुचाकीला कट मारत थांबविले. पोलिस वाहनातून उतरत नाहीत, तोपर्यंत चोरटे मुद्देमाल, दुचाकी सोडून जंगलात पळून गेले.

# स्मार्ट मीटरविरोधात शिवसेनेचा एल्गार

## ● पाचोरा येथे ठेकेदाराची मनमानी; संतप्त नागरिकांचा आरोप

**प्रतिनिधी । पाचोरा**

**पाचोरा व भडगाव शहर आणि तालुक्यात महावितरण कंपनीकडून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविले जात आहे. या घटनेच्या निषेधार्थ शिवसेनेने तीव्र आंदोलन केले आहे. शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर बारवकर यांच्या नेतृत्वाखाली महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढून विविध घोषणाबाजी केली.**



सर्वोच्च न्यायालयाने ग्राहकांच्या परवानगीशिवाय मीटर बदलण्यास मनाई केली असतानाही ठेकेदार मनमानी करत असल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला. यासोबतच, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्मार्ट मीटर जबरदस्तीने बसवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले होते. तरीही ठेकेदार स्वतःच्या फायद्यासाठी हा प्रकार करत असल्याचा दावा शिवसेनेने केला आहे. जर हे जबरदस्तीचे स्मार्ट मीटर बसवणे थांबवले नाही, तर शिवसेना शिवसेना स्टाईलने उत्तर देईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

स्मार्ट मीटर बसवताना ग्राहकांची परवानगी घेतली जात नसल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे. यावेळी पाचोरा महावितरण कंपनीचे अभियंता यांना निवेदन दिले. या आंदोलनात शिवसेना शहरप्रमुख सुमित सावंत, बंडू केशव सोनार, अन्वर शेख, गोपाल भोई, भारत राजेश भैरू, अमन किसन झनझोटे, पंकज गोसावी, शेरू शेख, करण कंडारी, रोहन पवार, मसूद शेख, दीपक मिस्तरी, अल्ताफ खान, संदीप पाटील, विजू माळी, दीपक पाटील, नितीन पाटील, संदीप पाटील यांच्यासह शिवसैनिक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३८ वर्षानंतर शेतकऱ्याला मिळाला प्रशासनाकडून न्याय

**प्रतिनिधी । अमळनेर**

तालुक्यातील देवगाव येथील गट नं १४४ च्या नोंद दुरुस्ती ३८ वर्षांपासून प्रलंबित होती. या प्रकरणाला उपविभागीय अधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांनी महसूल सप्ताहात न्याय मिळवून दिला.

विलासराव शांताराम पाटील यांच्या मालकीची २ हे.०६ आर जमीन चुकून पोट खराब सदरी दाखल झाल्याने गेली अनेक वर्षे ते आपल्या हक्काच्या जमिनीबाबत न्यायासाठी झगडत होते. मात्र, प्रांताधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांच्या कार्यतत्परतेमुळे हे प्रकरण मार्गी लागून त्यांना सुधारित ७/१२ उतारा प्राप्त झाला आहे. या प्रकरणाची मुळे दि. ११ जुलै १९८७ रोजीच्या फेरफार नोंद क्र. २३३८ मध्ये आहेत. त्यावेळी पाझर तलावासाठी गट नं. १४४ पैकी केवळ ०.२२ आर जमीन संपादित झाली असतानाही संपूर्ण २.२८ आर क्षेत्र तलावासाठी दाखवले गेले. परिणामी उर्वरित २.०६ आर जमीन देखील पोट खराब म्हणून नोंद झाली होती. या चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीसाठी विलासराव पाटील यांनी सतत पाठपुरावा केला. मात्र,प्रशासनाकडून योग्य प्रतिसाद मिळत नव्हता. या प्रकरणाचा तपास करताना प्रांताधिकारी मुंडावरे यांनी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, नायब तहसीलदार रवींद्र जोशी, तलाठी महेंद्र पाटील यांना सूचना दिल्या. तिन्हीस्तरांवर झालेल्या समन्वय व तत्परतेमुळे या प्रकरणाचा सकारात्मक शेवट झाला.